अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
०८.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

वर्षः ०७ | अंकः १८९ | पृष्ठेः ०६ | किंमतः ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235


chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712


## देवळा-मालेगाव रस्त्यावर भीषण अपघात, दोघांचा जागीच मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. देवळा-मालेगाव रस्त्यावरील पिंपळगाव (वा.) जवळ अर्टिगा कार आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झालाय.

देविदास पांडुरंग ठाकरे (वय २६) आणि कैलास पुंडलिक देवरे (वय ५५, दोघे रा. धोबीघाट, दहिवड, ता. देवळा) अशी अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळच्या सुमारासहा अपघात झाला. शुक्रवारी सायंकाळी देविदास ठाकरे आणि कैलास देवरे हे दोघे मोटारसायकलने दहिवडकडून देवळ्याच्या दिशेने येत होते. त्याच वेळी देवळ्याकडून दहिवडच्या दिशेने जाणाऱ्या मारुती अर्टिगा कारने पिंपळगाव (वा.) येथील वळणावर त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की दुचाकीवरील देविदास ठाकरे आणि कैलास देवरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला, तर अर्टिगा कारच्या पुढील भागाचेही मोठे नुकसान झाले.

देवळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी सहकाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने दोन्ही मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी देवळा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. या दुर्दैवी घटनेमुळे दहिवड परिसरासह देवळा तालुक्यात शोककळा पसरली आहे. या अपघातप्रकरणी देवळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## नियंत्रण सुटून प्रवासी बस थेट १०० फूट खाली कोसळली

### भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू, अनेक जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिमाचल प्रदेश/चंबा** – हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात शुक्रवारी बैरागढहून चंब्याकडे जाणाऱ्या खासगी बसचा चलुंज मोडजवळ भीषण अपघात झाला.

वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्यावरून घसरून सुमारे १०० फूट खाली असलेल्या रस्त्यावर कोसळली. सकाळी सुमारे ७.१५ वाजता घडलेल्या या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू, तर ११ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये बसचालक आणि वाहकाचाही समावेश असल्याची माहिती असून, अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

चलुंज मोडजवळ झाला अपघात बैरागढ–तिस्सा मार्गावरून बस चंब्याच्या दिशेने जात होती. बसने अवघे ३ किलोमीटर अंतर पार केले होते. चलुंज मोडजवळ वळण घेत असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून घसरून खाली असलेल्या दुसऱ्या रस्त्यावर कोसळली.

दुर्गम आणि धोकादायक डोंगरी मार्ग चुराह खोऱ्यातील हा सुमारे २७ किलोमीटरचा डोंगरी मार्ग अरुंद रस्ते आणि खोल दऱ्यांसाठी ओळखला जातो. सच पासकडे जाण्यासाठीही हा मार्ग महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या मार्गावर वाहन चालवताना मोठी खबरदारी घ्यावी लागते.

बसखाली अडकले प्रवासी अपघातानंतर बस उलटल्याने अनेक प्रवासी वाहनाखाली अडकले. प्रशासन आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. त्यानंतर पोलिस आणि बचाव पथकांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्याला वेग दिला.

बॅकहो लोडर्सच्या मदतीने बचावकार्य बस उचलण्यासाठी बॅकहो लोडर्सचा वापर करण्यात आला.

बसखाली आणि ढिगाऱ्याखाली अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकांनी प्रयत्न केले. जखमींना तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी हलवण्यात आले. बसचे बहुतांश प्रवासी स्थानिक प्राथमिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी बसमध्ये १८ ते २० प्रवासी असल्याची शक्यता आहे.

बसमधील बहुतांश प्रवासी स्थानिक असून ते चंबा शहराकडे जात होते. मात्र, अपघाताच्या वेळी बसमध्ये नेमके किती प्रवासी होते, याबाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही.

## थोडक्यात

### जव्हारमध्ये मोठे भूस्खलन : सततच्या घटनांमध्ये वाढ, लोकवस्ती नसल्याने अनर्थ टळला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जव्हार** – मुसळधार पाऊस आणि गेल्या काही महिन्यांपासून जाणवत असलेल्या भूकंपाच्या धक्क्यांच्या पार्श्वभूमीवर जव्हार तालुक्यात भूस्खलनाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. आपटाळे धरणाजवळ डोंगराचा मोठा भाग कोसळल्याने सुमारे २०० मीटर रस्ता वाहून गेला असून, प्रमुख जिल्हा मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. मात्र, डोंगराच्या पायथ्याशी लोकवस्ती नसल्याने मोठा अनर्थ टळला. राज्यमार्ग क्रमांक ७७ ते खडखड, कुंडाचा पाडा, आपटाळा, अळीवमाळ आणि आखरसाकूर या भागांना जोडणाऱ्या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १०७ वरील आपटाळा परिसरात २५ जुलैच्या रात्री भूस्खलन झाले.

## 'तिसऱ्या मुंबई'च्या विकासाला मिळणार वेग

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दिशेने महाराष्ट्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. रायगड–पेण ग्रोथ सेंटर आणि 'मुंबई ३.०' अर्थात 'तिसऱ्या मुंबई'च्या नियोजित विकासासाठी सिंगापूरमधील टेमासेक, सुरबाना ज्युराँग आणि मॅपलट्री या जागतिक दर्जाच्या संस्थांसोबत शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आले. या भागीदारीमुळे रायगड–पेण परिसरात १.१ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक परकीय थेट गुंतवणूक येण्याची शक्यता असून, उद्योग, रोजगार आणि आधुनिक नागरी विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), रायगड–पेण ग्रोथ सेंटर लिमिटेड (आरपीजीसीएल), टेमासेक, सुरबाना ज्युराँग आणि मॅपलट्री यांच्यात विविध करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, नीती आयोगाने एमएमआरमध्ये १.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता व्यक्त केली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे रायगड परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळत आहे. या पार्श्वभूमीवर सिंगापूरच्या अनुभवी संस्थांशी झालेली भागीदारी 'मुंबई ३.०' च्या विकासासाठी निर्णायक ठरेल. पायाभूत सुविधांची कामे वेगाने सुरू असल्याने देश–विदेशातील गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## संसदेत घडामोडींना वेग! काँग्रेसकडून तीन ओळींचा 'व्हिप' जारी

### एनडीएच्या सर्व खासदारांना दिल्लीत राहण्याचे आदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – संसदेच्या मान्सून अधिवेशनादरम्यान लोकसभेत आपली पूर्ण ताकद दाखवण्यासाठी मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू केली आहे. शुक्रवारी, ७ ऑगस्ट रोजी काँग्रेस पक्षाने आपल्या सर्व लोकसभा खासदारांना तीन ओळींचा व्हिप जारी करून सभागृहात उपस्थित राहण्याचे अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी संसदेत महत्त्वाच्या विधेयकावर चर्चा होणार असून त्यासाठी उपस्थित राहावे, असा आदेश काँग्रेसने त्यांच्या खासदारांना दिला आहे.

दुसऱ्या बाजूला, सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीनेही आपल्या सर्व खासदारांना सोमवार, १० ऑगस्टपासून राजधानी दिल्लीतच हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

'सभागृह स्थगित होईपर्यंत उपस्थित राहा' लोकसभेतील काँग्रेस संसदीय पक्षाचे मुख्य व्हिप कोडिकुन्निल सुरेश यांनी शुक्रवारी हा थ्री–लाईन व्हिप जारी केला.

त्यानुसार, १०, ११ आणि १२ ऑगस्ट (सोमवार ते बुधवार) या तीन दिवसांत सर्व खासदारांनी सकाळी ११ वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज स्थगित होईपर्यंत अनिवार्यपणे उपस्थित राहावे, असे आदेश देण्यात आले आहेत. या तीन दिवसांत लोकसभेत अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील विषयांवर चर्चा होणार असून, पक्षाची अधिकृत भूमिका ठामपणे मांडण्याचे निर्देश खासदारांना देण्यात आले आहेत.

## 'झिरो अटेंडन्स' कर्मचाऱ्यांचे वेतन रोखले

### कामगारांच्या आंदोलनानंतर महापालिकेचे स्पष्टीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**उल्हासनगर** – थकीत वेतनाच्या प्रश्नावरुन उल्हासनगर महापालिका मुख्यालयात कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. वेतन रखडण्यामागे आर्थिक अडचण नसून, मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली मधील उपस्थिती नोंदींतील त्रुटी आणि 'झिरो अटेंडन्स' ही प्रमुख कारणे असल्याचा दावा उल्हासनगर महानगरपालिकेने केला आहे. तसेच वेतनाशी संबंधित सर्व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी स्वतंत्र कठचड हेल्प डेस्क कार्यरत असल्याची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. थकीत वेतनाच्या मुद्द्यावरून कर्मचाऱ्यांनी आयुक्त कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन केल्यानंतर महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने स्पष्टीकरणात्मक प्रसिद्धिपत्रक जारी केले. त्यानुसार, महानगरपालिकेत मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आली असून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन उपस्थितीच्या नोंदींच्या आधारे तयार करून अदा केले जात आहे.



# सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांना कायमचे बाद करता येणार नाही : उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – सहकारी संस्थांच्या पॅनलवरून नाव वगळले म्हणून कोणत्याही लेखापरीक्षकाला (ऑडिटर) भविष्यातील पॅनलमधून कायमचे बाद करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० किंवा नियम, १९६१ मध्ये अशी कोणतीही तरतूद नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षक पॅनलमधून नाव वगळलेल्या व्यक्तींना कायमचे 'ब्लॅकलिस्ट' करण्याचे सहकार आयुक्तांचे परिपत्रक न्यायालयाने घटनाबाह्य ठरवले. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे सुनावणी झाली. सर्व पक्षकारांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकातील कायमस्वरूपी अपात्रतेची अट घटनाविरोधी असून ती कलम १९(१) (जी) अंतर्गत व्यवसाय करण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांचे प्रकल्प पेटंटमध्ये रूपांतरित करण्यासाठी प्राध्यापकांना प्रशिक्षण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन, नवसंशोधन (इनोव्हेशन) आणि बौद्धिक संपदा निर्मितीला चालना देण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या 'महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी'ने (एमएसईडीए) तीन दिवसांच्या राज्यस्तरीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आळंदी येथील 'एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग' येथे 'प्रोजेक्ट टू प्रॉडक्ट टू पेटंट्स' ही कार्यशाळा पार पडली.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश प्राध्यापकांना शैक्षणिक प्रकल्पांचे रूपांतर उत्पादनांमध्ये व पेटंटयोग्य नवकल्पनांसाठी कौशल्यांनी सुसज्ज करणे हा होता. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील अनुभवात्मक आणि प्रकल्प-आधारित शिक्षणावर यात भर देण्यात आला होता.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगच्या एकूण ४० प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यामध्ये वास्तविक जीवनातील समस्या शोधणे, त्यांच्या मूळ कारणांचे विश्लेषण करणे, उत्पादनाची डिझाईन, प्रोटोटाइप विकसित करणे, तसेच बौद्धिक संपदा अधिकार आणि पेटंट नोंदणी या संपूर्ण नवसंशोधन चक्राचा समावेश होता. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

नवसंशोधन साधनांची ओळख सहभागी प्राध्यापकांना 'फिशबोन डायग्राम', 'स्कॅम्पर' आणि 'सिक्स थिंकिंग हॅट्स' यांसारख्या नवसंशोधन साधनांची ओळख करून देण्यात आली तसेच पर्यावरण संवर्धन, हरित कॅम्पस आणि विज्ञान आश्रमाच्या 'करून शिका' या संकल्पनेवरही चर्चा करण्यात आली.

# नागरिकांनी खादीचा वापर वाढवावा : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**कुटीर महोत्सवाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**अमरावती** – शासनाने खादीच्या वापराला चालना देण्यासाठी विविध उपाययोजना केली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनाही एक दिवस खादीचे कापड घालणे बंधनकारक केले आहे. खादी उद्योगाच्या विकासासाठी नागरिकांनी खादीचा वापर वाढवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

राष्ट्रीय हातमाग दिनाच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसीमधील कस्तुरबा सोलर खादी महिला समितीच्या कुटीर महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे, उद्योग सहसंचालक नीलेश निकम यांच्यासह कस्तुरबा खादी महिला समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने हातमाग, खादी, सौर खादी तसेच पर्यावरणपूरक वस्त्रांना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण, आदिवासी महिलांच्या कौशल्याला सक्षम बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कुटीर महोत्सव दि. ३० ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी हातमाग व खादी ही केवळ वस्त्रनिर्मितीची परंपरा नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, स्थानिक रोजगार आणि आत्मनिर्भरतेचा मजबूत आधार आहे. नागरिकांनी खादीचा वापर वाढविल्यास या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी हातभार लागणार आहे. शासनाने खादी उद्योगाला सक्षम करण्यासाठी क्लस्टरची निर्मिती केली आहे. शासनाच्या वतीने या क्लस्टरला सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाणार आहे, असे प्रतिपादन केले.

कुटीर या ब्रँडच्या माध्यमातून सौर ऊर्जेवर चालणाऱ्या चरख्याद्वारे तयार होणारे सूत, खादी आणि सौरवस्त्र, तसेच हातमागावर तयार होणाऱ्या विविध उत्पादनांना आधुनिक डिझाइन आणि बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमातून ग्रामीण व आदिवासी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, पारंपरिक कौशल्याला आधुनिक बाजारपेठेची जोड मिळत आहे. कुटीर महोत्सवाच्या उद्घाटनानंतर जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सोलार चरखा, धागा तयार करण्याची प्रक्रिया, कापडावरील रंगकाम, एम्ब्रॉयडरी, कापडावरील प्रिंटींग आदीची पाहणी करून माहिती घेतली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**अमरावती** – राज्य शासनाच्या ऐतिहासिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्ग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज राज्यातील ६ लाख २२ हजार पात्र शेतकऱ्यांना ५ हजार २९ कोटींचा लाभ वितरीत करण्यात आला. याअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील ३३ हजार ४०१ पात्र शेतकऱ्यांना ३०८ कोटी १६ लाख २७ हजार २८ रुपयांच्या लाभाचे वितरण करण्यात आले.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' या योजनेच्या उच्चस्तरीय आढावा बैठकीनंतर पात्र शेतकऱ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते. या बैठकीस सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री, जिल्हाधिकारी, सहकारी संस्थांचे निबंधक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. राज्यातील शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ देण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील मागासवर्गीय शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत https://hmasnew.mahait.org संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमध्ये प्रवेशित मुला-मुलींना सर्व सोयी-सुविधा मोफत पुरविल्या जातात. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृहात ऑफलाईन स्वरूपात १५ सप्टेंबर पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. मुलांसाठी अमरावती शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. १, २, ३ - निंभोरा), भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह येथे तर मुलींनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह , क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह येथे अर्ज सादर करता येणार आहे.

# ... तर कर्मचारी राजीनामा देऊ शकतात!

**एफडीओ आयुक्त तुकाराम मुंढे यांचा इशारा**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) प्रयोगशाळांच्या काम काजाच्या वेळा वाढवण्याच्या निर्णयाचे समर्थन करताना आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, अन्न व औषधांच्या नमुन्यांची तपासणी करणाऱ्या सरकारी प्रयोगशाळांनी भविष्यात चोवीस तास (२४७) काम केले पाहिजे. नवीन सुधारित व्यवस्थेनुसार काम करण्याची इच्छा नसलेले कर्मचारी राजीनामा देऊ शकतात, असा थेट इशाराही त्यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर येथील एफडीए प्रयोगशाळेतील २९ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे कामाचा प्रचंड ताण, वीकेंड व सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी सक्तीचे काम आणि कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याबाबत तक्रार अर्ज सादर केला होता. त्यानंतर तुकाराम मुंढे यांनी ही भूमिका मांडली आहे.

वैयक्तिक, कौटुंबिक आयुष्यावर परिणाम कर्मचाऱ्यांनी १५ जुलैला दिलेल्या निवेदनात नवीन दोन-सत्र (टू-शिफ्ट) पद्धतीला विरोध दर्शवला होता. या आधी सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ अशी असलेली कार्यालयीन वेळ बदलून आता सकाळी ७ ते दुपारी ३ आणि दुपारी १२ ते रात्री ८ अशा दोन सत्रांत काम चालते. अतिरिक्त कामाचा ताण प्रयोगशाळेत विश्षक (ॲनालिस्ट), प्रयोगशाळा सहाय्यक, तांत्रिक कर्मचारी आणि मदतनीस यांची कमतरता आहे. यामुळे 'इंडियन, ब्रिटिश आणि युनायटेड स्टेट्स फार्माकोपिया'च्या मानकांनुसार नमुन्यांची तपासणी करणे आणि प्रलंबित नमुन्यांचा निपटारा करणे कठीण होत असल्याचे मत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, यावर स्पष्टीकरण देताना मुंढे यांनी सांगितले की, राज्यभरात अन्न भेसळ व असुरक्षित उत्पादनांविरोधात मोहीम तीव्र केली आहे.

# भाजप नेते विजय चौधरींना अटक : महिला नेत्यांबद्दल आक्षेपार्ह भाषा भोवली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नाशिक** – भाजपाचे उत्तर महाराष्ट्र संयोजक विजय चौधरी आणि मंत्री गिरीश महाजन यांची धक्कादायक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. ज्यानंतर खळबळ उडाली आहे.

विजय चौधरी हे माजी खासदार हिना गावित, रक्षा खडसे यांच्याबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरताना दिसले. याप्रकरणी डॉ.हिना गावित यांच्या भावाकडून विजय चौधरी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे विजय चौधरी यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून अटक करण्यात आली. डॉ.हिना गावित यांच्याबाबतच्या कथित आक्षेपार्ह ऑडिओ क्लिप प्रकरणात ही कारवाई करण्यात आली. चौधरी यांच्याविरुद्ध ॲट्रॉसिटी आणि विनयभंगाचा गुन्हा नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता.

समाजमाध्यमात वाऱ्याच्या वेगाने पसरलेल्या कथित ध्वनीफितीत भाजपच्या माजी खासदार डॉ.हिना गावित यांच्याबाबत आक्षेपार्ह आणि जातीवाचक स्वरूपाची विधाने केल्याचा आरोप करत नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये विजय चौधरीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. फक्त रक्षा खडसेच नाही तर डॉ.हिना गावित यांच्याबद्दलची अपशब्द बोलतानाची त्यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली.

ज्यानंतर नंदुरबारच्या राजकारणात खळबळ उडाली. आता हे प्रकरण थेट पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचले. रक्षा खडसे यांच्याबद्दल अपशब्द वापरल्यानंतरही त्यांनी कोणताही गुन्हा दाखल केला नाही.

## संपादकीय

**गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर, जो आपल्याला जीवनाची दिशा दाखवतो.**

### शिक्षणाला सुट्टी नको, सातत्य हवे!

शाळा म्हणजे केवळ चार भिंतींची इमारत नाही, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे संस्कारकेंद्र आहे. शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकातील धडे शिकवणारी व्यक्ती नाही, तर विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारा मार्गदर्शक असतो. त्यामुळे शाळा बंद आणि शिक्षकांचा प्रत्यक्ष संपर्क बंद झाला की त्याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. शाळा बंद + शिक्षक बंद = अभ्यास बंद ही परिस्थिती केवळ एका दिवसाची किंवा एका परीक्षेची समस्या नसून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेला गंभीर प्रश्न आहे. आजच्या काळात तंत्रज्ञानामुळे ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध झाला आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट, ऑनलाइन वर्ग, डिजिटल नोट्स आणि शैक्षणिक व्हिडिओ यांच्या माध्यमातून शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र ऑनलाइन शिक्षण हे प्रत्यक्ष शाळेचा पूर्ण पर्याय ठरू शकत नाही. प्रत्येक विद्यार्थ्याकडे समान सुविधा नसतात. काही विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नाही, काहींकडे इंटरनेटची अडचण आहे, तर काही विद्यार्थ्यांच्या घरातील परिस्थितीमुळे नियमित ऑनलाइन वर्गात सहभागी होणे शक्य होत नाही. शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून त्यांना धडा समजला आहे की नाही, हे ओळखू शकतात. एखादा विद्यार्थी शांत का आहे, कोणाला प्रश्न पडला आहे, कोणाचा अभ्यास मागे पडत आहे, कोणाला अधिक मार्गदर्शनाची गरज आहे, हे शिक्षक प्रत्यक्ष संपर्कातून समजू शकतात. ऑनलाइन वर्गामध्ये ही मानवी नाळ अनेकदा तुटते. स्क्रीनसमोर बसणे म्हणजे शिकणे असे नाही.
शिक्षणासाठी संवाद, प्रश्नोत्तर, चर्चा, शिस्त, सहकार्य आणि सततचे मार्गदर्शन आवश्यक असते. शाळा बंद राहिल्यास विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची नियमितता बिघडते. सुरुवातीला काही दिवस अभ्यासापासून दूर राहणे सहज वाटते; परंतु हळू-हळू त्याची सवय लागते. गृहपाठ पुढे ढकलला जातो, पुस्तक वाचन कमी होते, अभ्यासाचे वेळापत्रक कोलमडते आणि परीक्षेची तयारी शेवटच्या क्षणी करण्याची वेळ येते. विशेषतः प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. कारण या वयात तयार होणाऱ्या मूलभूत शैक्षणिक सवयी पुढील शिक्षणाचा पाया घडवतात. शिक्षणात सातत्याला फार मोठे महत्त्व आहे. गणितातील एक संकल्पना नीट समजली नाही तर पुढील धड्यात अडचण निर्माण होते. विज्ञानातील मूलभूत संकल्पना समजल्या नाहीत तर पुढील विषय कठीण वाटू लागतात. भाषेचा नियमित सराव नसेल तर लेखन आणि वाचनाची क्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे शाळा किंवा शिक्षकांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनात खंड पडल्यास त्याचा परिणाम एका विषयापुरता मर्यादित राहत नाही. यामध्ये शिक्षकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. पण त्यापलीकडे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करणे, आत्मविश्वास वाढवणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे आणि योग्य-अयोग्य यातील फरक समजावून सांगणे हेही शिक्षकाचे काम आहे.




# आंबेडकरवादी विचारांची आजच्या समाजाला गरज

**बाबासाहेबांना केवळ स्मरण करण्यापेक्षा त्यांच्या विचारांना आपल्या आचरणाचा भाग बनविणे आवश्यक आहे. कारण समतेचा समाज घोषणांनी नव्हे, तर विचार आणि कृतीच्या सातत्याने निर्माण होतो.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ एका समाजासाठी नव्हे, तर संपूर्ण भारतीय समाजासाठी विचारांची समृद्ध परंपरा निर्माण केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाजरचनेचे स्वप्न त्यांनी पाहिले. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समान अधिकार देताना त्यांनी लोकशाहीचा पाया अधिक मजबूत केला. त्यामुळे आंबेडकरवाद हा केवळ एखाद्या जातीपुरता किंवा समूहापुरता मर्यादित विचार नसून तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि विवेकवादाचा व्यापक विचार आहे.

आज देश वेगाने बदलत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने जीवन सुलभ झाले, शिक्षणाच्या संधी वाढल्या आणि आर्थिक प्रगतीचे नवे मार्ग खुले झाले. मात्र या विकासाबरोबरच सामाजिक विषमता, भेदभाव, बेरोजगारी, शिक्षणातील असमानता आणि सामाजिक तणावाचे प्रश्नही कायम आहेत. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अधिक गांभीर्याने समजून घेण्याची गरज आहे.

आंबेडकरवादी विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे समता. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान आणि समान संधी मिळाली पाहिजे, ही त्यामागची मूलभूत भूमिका आहे. जन्माच्या आधारावर माणसाची किंमत ठरविणारी मानसिकता समाजाच्या प्रगतीला अडथळा ठरते. आज कायद्याने भेदभावाला विरोध असला तरी सामाजिक मानसिकतेमध्ये बदल घडवून आणणे हे अजूनही मोठे आव्हान आहे.


डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. शिक्षणामुळे माणूस प्रश्न विचारायला शिकतो, आपल्या अधिकारांची जाणीव होते आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद निर्माण होते. आज शिक्षणाची दारे मोठ्या प्रमाणात खुली झाली असली तरी गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांपर्यंत समान पद्धतीने पोहोचले आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक सुविधा, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि दुर्बल विद्यार्थ्यांच्या संधी यातील अंतर कमी करणे आवश्यक आहे.

आंबेडकरवादी विचारांचा आणखी एक महत्त्वाचा आधार म्हणजे विवेकवाद. कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारण्याऐवजी तिचा तर्क आणि परिणाम तपासण्याची वृत्ती समाजात निर्माण झाली पाहिजे. आज सोशल मीडियाच्या काळात अफवा, चुकीची माहिती आणि द्वेषपूर्ण संदेश वेगाने पसरतात. अशा वेळी चिकित्सक विचार करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरते. बाबासाहेबांचा विचार आपल्याला अंधानुकरणाऐवजी प्रश्न विचारण्याची आणि सत्य शोधण्याची दिशा देतो.

लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. लोकशाही म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांचा आदर, कायद्याचे राज्य आणि मतभिन्नतेचा सन्मान. डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक मार्गाने सामाजिक परिवर्तनावर भर दिला. आज राजकीय आणि सामाजिक मतभेद वाढताना दिसत असताना संविधानातील लोकशाही मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आंबेडकरवादाचा अर्थ केवळ घोषणा देणे किंवा महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी साजऱ्या करणे एवढाच नसावा. बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे ही खरी आदरांजली आहे. आपल्या वर्तनातून भेदभाव कमी करणे, मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, महिलांचा सन्मान करणे, कायद्याचा आदर करणे आणि दुर्बल घटकांना समान संधी मिळण्यासाठी प्रयत्न करणे हीच आंबेडकरवादी विचारांची खरी अंमलबजावणी आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर अनेक नवीन आव्हाने आहेत. स्पर्धा, बेरोजगारी, डिजिटल जग, बदलती अर्थव्यवस्था आणि सामाजिक माध्यमांचा प्रभाव यामुळे तरुणांचे जग झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी बाबासाहेबांचा शिक्षण, संघटन आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश तरुणांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. मात्र हा विचार केवळ इतिहासाच्या पुस्तकात न राहता वर्तमानातील प्रश्नांशी जोडला गेला पाहिजे.




महिलांच्या सक्षमीकरणाचाही आंबेडकरवादी विचारांमध्ये महत्त्वाचा वाटा आहे. महिलांना शिक्षण, संपत्ती, रोजगार आणि समान अधिकार मिळाले पाहिजेत, यासाठी बाबासाहेबांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आज महिलांनी विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली असली तरी सुरक्षितता, शिक्षण, रोजगार आणि समान संधी याबाबत अजूनही अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजविणे गरजेचे आहे. आंबेडकरवादाला केवळ राजकीय चौकटीत पाहणे ही त्याची व्याप्ती कमी करण्यासारखे आहे. हा विचार सामाजिक परिवर्तनाचा, मानवी प्रतिष्ठेचा आणि न्याय्य समाजनिर्मितीचा आहे. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय होत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवणे आणि प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचा सन्मान करणे हा त्याचा मूलभूत संदेश आहे.

आज भारताला आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकासाचीही गरज आहे. मोठे रस्ते, उंच इमारती, डिजिटल सुविधा आणि औद्योगिक प्रगती महत्त्वाची आहे; पण त्याचबरोबर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि न्याय पोहोचणेही तितकेच आवश्यक आहे. विकासाचा खरा अर्थ समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी मिळण्यात आहे.

म्हणूनच आजच्या काळात आंबेडकरवादाची गरज पूर्वीपेक्षा कमी झालेली नाही; उलट ती अधिक व्यापक झाली आहे. बाबासाहेबांचा विचार कोणाच्या विरोधात उभे राहण्यापेक्षा अन्याय, विषमता आणि अज्ञानाच्या विरोधात उभे राहण्याची प्रेरणा देतो. संविधानिक मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता आणि मानवी बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवून समाज घडविणे हीच खरी आंबेडकरवादी वाटचाल ठरेल.

# पैसा, प्रतिष्ठा आणि गुन्हेगारीचा वाढता विळखा

पैसा हा माणसाच्या जीवनातील आवश्यक घटक आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित जीवनासाठी पैसा आवश्यक असतो. पैसा कमावणे, आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आणि कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करणे, ही प्रत्येकाची स्वाभाविक इच्छा आहे. मात्र जेव्हा पैसा हे साधन न राहता जीवनाचे अंतिम ध्येय बनते, तेव्हा त्यातून अनेक सामाजिक समस्या जन्माला येतात. झटपट श्रीमंत होण्याची मानसिकता, वाढती आर्थिक विषमता, प्रतिष्ठेची स्पर्धा आणि चुकीच्या मार्गाने पैसा मिळवण्याची प्रवृत्ती यामुळे गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याचे चित्र अनेकदा दिसून येते.

आज समाजात यशाचे मोजमाप अनेकदा व्यक्तीच्या चारित्र्यापेक्षा त्याच्याकडे किती पैसा आहे, यावर केले जाते. महागडी वाहने, मोठी घरे, महागडे मोबाईल, ब्रँडेड वस्तू आणि ऐषआरामी जीवनशैली यांचे आकर्षण वाढत आहे. सोशल मीडियामुळे ही स्पर्धा आणखी तीव्र झाली आहे. दुसऱ्याचे सुख-संपन्न जीवन पाहून स्वतःकडेही तेच असावे, अशी इच्छा निर्माण होते. परंतु ते मिळवण्यासाठी योग्य मार्गाने मेहनत करण्याऐवजी काही जण शॉर्टकटचा मार्ग स्वीकारतात. याच मानसिकतेतून फसवणूक, चोरी, आर्थिक गैरव्यवहार, सायबर गुन्हे आणि इतर अनेक प्रकारच्या गुन्ह्यांना चालना मिळू शकते.




गुन्हेगारीमागे केवळ गरिबी हे एकमेव कारण नाही. आर्थिक अडचणींमुळे काही व्यक्ती गुन्हेगारीकडे वळू शकतात; परंतु मोठ्या आर्थिक फायद्यासाठी केले जाणारे अनेक गुन्हे आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तींकडूनही घडतात. भ्रष्टाचार, आर्थिक फसवणूक, बनावट कागदपत्रे, करचुकवेगिरी, बेकायदेशीर व्यवहार आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक यामागे अधिकाधिक पैसा मिळवण्याची लालसा असते. त्यामुळे गुन्हेगारीचा प्रश्न हा केवळ गरीब किंवा बेरोजगार व्यक्तींशी जोडून पाहणे चुकीचे ठरेल.

आज सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असताना पैशाच्या लालसेने निर्माण होणाऱ्या नव्या धोक्यांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून लोकांपर्यंत सहज पोहोचता येत असल्याने फसवणुकीचे प्रकार अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. बनावट संदेश, खोटे फोन, बनावट गुंतवणूक योजना आणि विविध प्रकारच्या ऑनलाइन आमिषांमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक होऊ शकते. येथे गुन्हेगाराला प्रत्यक्ष व्यक्तीसमोर उभे राहण्याचीही गरज नसते. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून आर्थिक नुकसान केले जाते.

पैशासाठी गुन्हा करणाऱ्या व्यक्तीचा परिणाम केवळ पीडित व्यक्तीवर होत नाही. त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर आणि समाजाच्या विश्वासव्यवस्थेवर होतो. एखाद्या व्यक्तीची फसवणूक झाली की तिचा आर्थिक तोटा होतोच; पण त्यासोबत मानसिक तणावही निर्माण होतो. लोकांचा एकमेकांवरील विश्वास कमी झाला तर सामाजिक नात्यांमध्ये संशय निर्माण होतो. त्यामुळे आर्थिक गुन्हे हे केवळ पैशांचे नुकसान नसून सामाजिक विश्वासालाही धक्का देणारे असतात.

यामध्ये तरुण पिढीचा विचार विशेष महत्त्वाचा आहे. तरुणांमध्ये ऊर्जा, महत्त्वाकांक्षा आणि नवीन काही करण्याची इच्छा असते. हीच ऊर्जा योग्य दिशेने वापरली तर समाजाच्या प्रगतीला मोठी चालना मिळू शकते. मात्र कमी वेळात मोठे पैसे कमावण्याचे आकर्षण निर्माण झाले आणि त्याला चुकीच्या मार्गाची जोड मिळाली, तर परिस्थिती धोकादायक होऊ शकते. त्यामुळे तरुणांना केवळ शिक्षण देणे पुरेसे नाही; त्यांना आर्थिक शिस्त, कायद्याचे ज्ञान, नैतिक मूल्ये आणि मेहनतीचे महत्त्वही समजावून सांगणे आवश्यक आहे.

पालकांची आणि शैक्षणिक संस्थांची भूमिका येथे महत्त्वाची ठरते. मुलांच्या यशाचा अर्थ फक्त चांगले गुण, महागड्या वस्तू किंवा मोठी नोकरी असा न करता प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि चांगले चारित्र्य यांनाही महत्त्व दिले पाहिजे. काहीही करून यश मिळव अशी मानसिकता धोकादायक आहे. त्याऐवजी योग्य मार्गाने यश मिळव हा संस्कार आवश्यक आहे.

समाजात आर्थिक विषमता वाढली की असंतोष वाढण्याची शक्यता असते. एका बाजूला संपत्तीचे मोठे प्रदर्शन आणि दुसऱ्या बाजूला मूलभूत गरजांसाठी संघर्ष, असे विरोधाभासी चित्र दिसल्यास सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो. मात्र यावर उपाय म्हणून गुन्हेगारीला समर्थन देता येणार नाही. गरिबी, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी शासनाने रोजगाराच्या संधी, कौशल्यविकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक सुरक्षेच्या योजना प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे.

गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिस आणि न्यायव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची आहेच. परंतु केवळ गुन्हा घडल्यानंतर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. गुन्हेगारीची कारणे समजून घेऊन प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती, आर्थिक व्यवहारांमध्ये सावधगिरी, शाळा-महाविद्यालयांमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन आणि समाजात नैतिक मूल्यांची जपणूक यावरही भर दिला पाहिजे.

पैसा वाईट नाही; पैशाबद्दलची चुकीची मानसिकता धोकादायक ठरू शकते. पैसा माणसाच्या गरजा पूर्ण करण्याचे साधन आहे, माणुसकी गमावण्याचे कारण नव्हे. आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक जबाबदारी आणि नैतिकता टिकवणे आवश्यक आहे. संपत्ती वाढवताना प्रामाणिकपणा कमी झाला, तर त्या संपत्तीचे मूल्यच उरत नाही. आजच्या काळात समाजाने एक महत्त्वाचा प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे आपल्याला श्रीमंत समाज हवा आहे की मूल्यवान समाज? दोन्ही गोष्टी एकत्र साध्य होऊ शकतात; पण त्यासाठी पैसा कमावण्याच्या मार्गाइतकेच त्या पैशाचा उपयोग आणि त्यामागची मूल्यव्यवस्था महत्त्वाची आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# 'प्रत्यक्ष कर दुरुस्ती विधेयक २०२६' लोकसभेत मंजूर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – देशांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला प्रोत्साहन देणे, परदेशी भांडवल आकर्षित करणे आणि डिजिटल व्यवहारांवरील शून्य-एमडीआर चौकटीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने आणलेले 'कर आणि इतर कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२६' मंगळवारी लोकसभेत मंजूर करण्यात आले. विधेयक ५ जून रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशाची जागा घेईल. या विधेयकाद्वारे पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स ॲक्ट २००७, आयकर कायदा २०२५ आणि वित्त कायदा २०२६ मध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रमुख वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे बदल मुख्य उद्देश : परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला गती देणे.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

# छोट्या कंपन्यांची हमी मोठी! बड्या कंपन्यांमध्ये एआय मुळे नोकरी जाण्याची शक्यता अधिक : नंदन निलेकणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – ऑटोमेशन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) मुळे कामे अधिक सुलभ होत असल्याने येत्या काही वर्षांत भारतातील मोठ्या कंपन्यांमध्ये नोकऱ्यांची संख्या घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात रोजगाराचा मुख्य आधार लाखो लहान व्यवसायच असतील, असे इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन निलेकणी यांनी गुरुवारी सांगितले.

एनसीएईआरचे अध्यक्ष असलेल्या निलेकणी यांनी 'एनसीएईआर इंडिया पॉलिसी फोरम २०२६'मध्ये भारत रोजगार निर्मितीकडे ज्या दृष्टीने पाहतो त्या 'मानसिक मॉडेल'मध्ये मूलभूत बदल करण्याचे आवाहन केले. अत्यंत सुव्यवस्थित असलेल्या मोठ्या कंपन्यांमधील नोकऱ्यांवर गंडांतर येण्याचा धोका सर्वाधिक असेल. कारण तेथे प्रत्येक नोकरी ही ठराविक कामांच्या संचापुरती मर्यादित असते. त्यामुळे ती कामे ऑटोमेट करून नोकऱ्या कमी करणे सोपे आहे. म्हणूनच, येत्या काळात मोठ्या कंपन्यांमध्ये नोकऱ्यांची निव्वळ घट होण्याचीच शक्यता जास्त आहे, असे निलेकणी म्हणाले. याउलट, भारतीय अर्थव्यवस्थेचे भविष्य हे तिच्या 'लाखो लहान व्यवसायांमध्ये' आहे. ते एआयमुळे होणाऱ्या बदलांना तोंड देण्यास अधिक सक्षम आहेत, असा युक्तिवाद त्यांनी केला. जेव्हा तुमच्याकडे लाखो लहान कंपन्या असतात तेव्हा त्यांना प्रभावित करण्यासाठी एआयचा वापर करणे अधिक गुंतागुंतीचे असते. त्यामुळे या लहान कंपन्या नोकऱ्यांच्या नुकसानापासून अधिक सुरक्षित आणि लवचिक असतात. तसेच त्या अधिक नवीन रोजगार निर्माण करतील, असेही ते म्हणाले. बदलाला पाठबळ देण्यासाठी निलेकणी यांनी मोठ्या प्रमाणावर अनियंत्रण आणि सोप्या व्यवसाय पद्धतींच्या गरजेवर भर दिला. लहान उद्योजकांवर नियमांचा अतिरिक्त भार पडू नये म्हणून त्यांचे रक्षण केले पाहिजे.

## स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू विद्यालयाच्या

# विद्यार्थिनींची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदूरजनाघाट** – स्थानिक मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूलच्या विद्यार्थिनीनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारा आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा बहूमान मिळवला असून विद्यालया मधून एकूण पाच विद्यार्थी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला प्रविष्ट झाले होते. इयत्ता ७ च्या फजीला अनम वसीमशा व जुबिया कौसर अश्फाकऊल्ला खान यांचा समावेश आहे. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरल्या आहेत.

याप्रसंगी मिल्लत संस्थेचे अध्यक्ष अब्दुल शकील, मुख्याध्यापक, व्यवस्थापक, एहराज फैसल, दरक्षा अंजुम मो.निसार, शेख मुनज्जीम, नइम खान तसेच एच. के.एम.उर्दू हायस्कूलचे नईम शेख जरुडकर, मिर्झा शहजाद अख्तर, सय्यद सादिक, नईम अहमद, अब्दुल कलीम, फरीदा यास्मिन, नाजिम खान, तौफिक अहमद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

## जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय

# पालक शिक्षक सभेचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय आणि जनता उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑगस्टला शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे तर प्रमुख अतिथी म्हणुन उपाध्यक्ष सतिश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, ज्येष्ठ संचालक अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे, ॲड.प्रभाकर सावरकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते तसेच पालक प्रतिनिधी अरुण वरुडकर, देवेंद्र देवघरे, राधाताई चव्हाण, प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, प्रा.प्रदीप काळे हे सुध्दा मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर प्रदिप अकर्ते, उमेश तडस, देवेंद्र देवघरे, राधाताई चव्हाण इत्यादी पालकांनी आपले मत व्यक्त केले.

प्राचार्य मनोहर गणोरकर यांनी पालकांनी शिक्षकांना समजून घ्यावे, आपल्या मुलांचे मित्र कोण आहेत, हे तपासावे तसेच आजच्या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी तयार असावे. कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश काळे यांनी काही माणसे जन्माने मोठी असतात तर काही माणसे कर्तव्याने मोठे होतात तसेच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणारी संस्था म्हणजे शाळा होय, असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रविण आकोटकर, प्रास्ताविक पर्यवेक्षक उमेश काळे तर आभार प्रफुल बनसोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# महिला डॉक्टर मारहाण प्रकरण : रमेश म्हात्रेंना जामीन मंजूर, राज्यात न थांबण्याची अट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – ठाणे जिल्ह्यातील पालिकेच्या रुग्णालयात डॉक्टरांना मारहाण केल्याचा आरोप असलेले शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांना मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला.

तसेच, या प्रकरणाचा खटला जलदगतीने आणि विशिष्ट मुदतीत चालवून पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. गेल्या महिन्यात या कथित मारहाण प्रकरणातील अन्य चार आरोपींनाही उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्या. गौतम अंखाड यांच्या खंडपीठाने म्हात्रे आणि इतर आरोपींवर कडक अटी लादल्या असून, या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत त्यांना महाराष्ट्राबाहेर राहण्याचे आदेश दिले आहेत. खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले की, 'एक निवडून आलेला नगरसेवक हा 'जनतेसाठी आणि जनतेद्वारे' असतो असे मानले जाते. जर अशा लोकप्रतिनिधीने आपल्याच मतदारांवर हल्ला केला, तर तो लोकशाहीच्या मूलभूत चौकटीवरच केलेला हल्ला आहे. तथापि, आता या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे आणि आरोपींनी काही काळ तुरुंगात घालवला आहे ही बाब लक्षात घेता जामीन मंजूर केला जाऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने सर्व आरोपींना दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत महाराष्ट्राबाहेर राहण्याचे आदेश दिले आहेत. केवळ जेव्हा ट्रायल कोर्ट या प्रकरणात आरोप निश्चित करेल, तेव्हाच आरोपींना महाराष्ट्रात परतण्याची परवानगी दिली जाईल.

## जातीनिहाय जनगणनेकरीता काढण्यात आलेल्या

# मंडल यात्रेचे वरुड शहरात स्वागत




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिश काळात १८८१ पासून ते १९३१ पर्यंत जातीनिहाय जनगणना झाली. स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत ओबीसीची जनगणना झालीच नाही. या निषेधार्थ काढण्यात आलेल्या मंडल यात्रेचे वरुड शहरातील पांढुर्णा चौक येथे स्वागत करण्यात आले.

भारत सरकारच्या गृहविभागाच्या जनगणना कार्यालयाच्या मार्फत दर दहा वर्षांनी जनगणना होते त्यात फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचीच जातीनिहाय जनगणना होते. ओबीसी व खुला प्रवर्ग यांची सरसकट जनगणना केली जाते. त्यामुळे ओबीसीची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, नोकरी व व्यवसाय क्षेत्रातील खरी परिस्थिती कळत नाही. शासनाला कोणत्याही वर्ग समूहासाठी धोरण आखण्यासाठी त्या वर्गातील सर्व जातीची इतंभूत माहिती शासनाकडे असणे गरजेचे आह, त्याकरिता संपूर्ण विदर्भात ओबीसीची जातीनिहाय जनगणना करण्याकरता निघालेल्या मंडल यात्रेचे स्वागत पांढुर्णा चौक येथे करण्यात आले. या यात्रेचे नेतृत्व मुख्य संयोजक उमेश कोरराम, ओबीसी जन मोर्चा सरचिटणीस प्रवीण पेटकर, डॉ.विलास काळे यांनी केले तर स्वागत प्रसंगी दिलीप भोयर, डॉ.नीलकंठ यावलकर, भागवत आंडे, बाबाराव ठाकरे इत्यादी शहर व परिसरातील जनसमूह मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

## श्री विश्वकृपा आयुर्वेदालय वरुड आणि न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने

# सहावा 'रानभाजी महोत्सव' न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट परिसरात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)






**वरुड** – निसर्गदत्त रानभाज्यांचे आरोग्यविषयक आणि आयुर्वेदिक महत्व जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी श्री विश्वकृपा आयुर्वेदालय वरुड आणि न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट यांच्या संयुक्त विद्यमाने सहावा 'रानभाजी महोत्सव' न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

**कार्यक्रमाचे उदघाटन**

कार्यक्रमाचे उदघाटन निमा आयुर्वेद फोरम महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.अमोल ठवळी यांचे हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी ऑरेंजसिटी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुधाकर ठाकरे होते.

**प्रमुख उपस्थिती**

यावेळी डॉ.राम गोधने, अनिल गुल्हाने, श्याम खंडेलवाल, डॉ.वेदांत राजोरिया, गोपाल वानखडे, ॲड.विनय यावलकर, रामभाऊ राऊत, डॉ.दिनेश गवळी, डॉ.मीना बंदे, नितीन खेरडे, डॉ.सोनाली आंडे, डॉ.शैलेश लोखंडे, डॉ.मनोहर आंडे, डॉ.तृप्ती होले, डॉ.विनीता राजोरिया यांची प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थिती होते.

**महोत्सवातील ठळक बाबी**

महोत्सवात रानभाजी ओळख, महत्व, प्रदर्शनी, रेसिपी आणि रानभाजी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तांदळजा, चाकवत, शेपू, तरोटा, समुद्रशोप कुर्डू, आळू, वाघाटे यांसारख्या विविध रसायनमुक्त रानभाज्यांची माहिती आणि त्यांचे आयुर्वेदानुसार फायदे यावेळी तज्ज्ञांनी नागरिकांना सांगितले. पारंपरिक पद्धतीने बनवलेल्या रानभाजीच्या रेसिपींना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रानभाजी स्पर्धेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाकरिता डॉ.अंकुर डालके, डॉ.अंकुश मानकर, डॉ.आकाश चागोले, डॉ.अश्विन जनईकर, डॉ.रेणुका जनईकर, डॉ.संदीप बेहरे, प्राजक्ता बेहरे आदी उपस्थित होते. न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या रानभाज्यांचे विशेष परीक्षण निरंजना तडस, संध्या वांदे, शर्मिला खासबागे, सुप्रिया बंदे, मंदा फोकमारे, तारकेश्वरी सायर, मंजु खेरडे, नीता खेरडे, डॉ.सोनाली सुपले, प्रिया लोखंडे, डॉ.सिम्पल नाईक, शैलजा गोरडे, माया यावलकर, विलास मेंढे, डॉ.पंकज केचे, प्रणिता सोनारे यांनी सहकार्य केले.

> 'आजच्या रासायनिक युगात रानभाजी हे आरोग्याचे खरे रसायन आहे. ही परंपरा पुढील पिढीपर्यंत नेणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे', असे मनोगत कार्यक्रमाचे संयोजक तथा श्री विश्वकृपा आयुर्वेदालय व पंचकर्म केंद्राचे संचालक डॉ.चरण सोनारे यांनी सांगितले.

**सहकारी संस्थांचे सहकार्य**

या महोत्सवासाठी निमा/निमा वूमन्स फोरम, निमा आयुर्वेद फोरम, जायंट्स ग्रुप, आयुष विभाग ग्रामीण रुग्णालय, हरी सेवा फाऊंडेशन, माऊली गृह उद्योग व महिला विकास मंच, सपना गोधने, राजेश आकोटकर यांनी सहकार्य केले. निसर्गाशी जोडणारा आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारा हा महोत्सव नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत यशस्विरित्या पार पडला.

# शाह सेनेच्या गद्दारांना भेटून मोदी महाशय बेशरमपणे सांगतात, भिऊ नका, मी तुमच्या पाठिशी; सुप्रीम कोर्टाला धमकावत आहात का? धमकीवजा सल्ला कोणाला दिलात?

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – 'चिंता करू नका, मी तुमच्या पाठीशी आहे.' हा संदेश ते कोणाला देतायत? कोर्टाला धमकावणी देत आहात का? का अमित शाहांना देतायत? अशा शब्दात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, मागे असं होतं की हे मिंधे जायचे तेव्हा ते त्यांच्या शाहसेनेच्या प्रमुखाला भेटायचे. आता शाहसेनेच्या प्रमुखाला भेटायची त्यांना गरज नाही, कारण त्यांचा आता बहुतेक बॉस बदललाय. आता ते थेट मोदींना भेटतात. आणि विशेष म्हणजे शाह इकडे असताना ते मोदींना भेटतायत. 'भिऊ नको, मी तुझ्या पाठीशी आहे' ही धमकीवजा संदेश सुप्रीम कोर्टाला मोदींनी दिलाय का? की अमित शाहांना दिला आहे? की फडणवीसांना दिला आहे? की प्रशासनाला दिलेला आहे? नक्की कोणाला दिलेला आहे? अशी विचारणा उद्धव ठाकरे यांनी केली. शिवसेना शिंदे गटाच्या खासदारांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीएम मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीत मोदी यांनी भिऊ नको, मी तुमच्या पाठिशी असल्याचे सांगितले होते. सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाची सुनावणी सुरु असताना शिंदे दिल्लीत पोहोचल्याने राजकीय भूवया उंचावल्या होत्या.

# अजितदादांना न्याय कधी मिळणार?

## राष्ट्रवादीच्या कार्यालयाबाहेर काँग्रेसचं आंदोलन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयाच्या बाहेर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केलं आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना न्याय कधी मिळणार? असा सवाल उपस्थित करत काँग्रेसच्या कार्यकर्ते थेट राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयाच्या बाहेर पोहोचल्याचं पाहायला मिळालं. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची देखील झाली. मीरा रोड येथून आलेल्या काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

दादांच्या नावावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी राजकारण करू नये : सुरज चव्हाण

दरम्यान, काँग्रेसने केलेल्या या आंदोलनावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी टीका केली आहे. अजितदादा हे राजकारणाचा विषय नसून दादा प्रेमीसाठी तो अस्मितेचा विषय आहे. दादांच्या नावावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी राजकारण करू नये असे चव्हाण म्हणाले.

आज काँग्रेस पक्षाचे चार कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रवादी भवनासमोर येऊन माननीय स्व. अजितदादा पवार यांच्या नावाने राजकारण करत आहेत. अजितदादा हे आमच्यासाठी राजकारणाचा विषय नसून तो आमच्या अस्मितेचा विषय आहे. त्यांच्या नावाचा राजकीय वापर करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला डिवचण्याचा प्रयत्न काँग्रेसने करू नये असा इशार देखील चव्हाण यांनी दिला.

मेळघाट प्रादेशिक वनविभागाचा उपक्रम

# चिचाटी धबधब्याकडे मार्गदर्शित निसर्ग भ्रमंती सुरू : स्थानिक २० युवकांना मिळाला रोजगार



(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती** – मेळघाट प्रादेशिक वन विभाग, परतवाडा अंतर्गत येणाऱ्या घटांग वन परिक्षेत्रातील चिचाटी गावातील 'चिचाटी धबधबा' येथे मार्गदर्शित निसर्ग भ्रमंती (गाइडेड नेचर ट्रेल) सुरू करण्यात आली आहे. अवघ्या दोन आठवड्यात ६०० पर्यटकांनी भ्रमंती केली असून स्थानिक २० युवकांना यामाध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे.

निसर्गप्रेमींची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २५ जुलै २०२६ पासून ही भ्रमंती अधिकृतपणे सुरू झाली आहे. चिचाटी ग्रामसभेच्या ठरावानुसार आणि मेळघाट प्रादेशिक वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण उपक्रमाचे व्यवस्थापन 'संयुक्त वन व्यवस्थापन समिती, चिचाटी' द्वारे केले जात आहे.

चिचाटी गाव ते चिचाटी धबधबा यादरम्यानचा ४ कि.मी.चा मार्ग निसर्गसौंदर्याने नटलेला असून पर्यटकांसाठी हे मुख्य आकर्षण ठरत आहे.

पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि स्थानिक रोजगार २५ जुलैपासून सुरू झालेल्या या उपक्रमाला निसर्गप्रेमींकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या काही दिवसांत तब्बल ६०० हून अधिक पर्यटकांनी या निसर्ग भ्रमंतीचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे चिचाटी गावातील २० स्थानिक युवकांना थेट रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

निसर्ग भ्रमंतीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांना संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. सुरक्षेच्या व माहितीच्या दृष्टीने पर्यटकांसोबत चिचाटी गावातील स्थानिक निसर्ग मार्गदर्शक (गाईड) असणे बंधनकारक करण्यात आले आहे.या भ्रमंतीसाठी प्रतिव्यक्ती २०० रुपये शुल्क आकारले जात आहे. स्थानिक पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी धारणी व चिखलदरा तालुक्यातील स्थानिक नागरिकांसाठी हे शुल्क सवलतीच्या दरात १०० रुपये ठेवण्यात आले आहे. या शुल्कातच निसर्ग मार्गदर्शकाचे मानधन अंतर्भूत आहे.

अमरावतीहून चिचाटी धबधब्याकडे जाण्यासाठी अमरावतीहून परतवाडा आणि पुढे धामणगाव गढी मार्गे देवगाव आणि चिचाटी येथे पोहचता येते. जास्तीत-जास्त निसर्गप्रेमींनी या मार्गदर्शित भ्रमंतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वन विभाग व संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# फेसबुक आणि इन्स्टाग्रामने तरुणांच्या मानसिक आरोग्याची हानी : अमेरिकन कोर्टाने मेटाला ९ हजार कोटींचा दंड ठोठावला, दंडाच्या रक्कमेत तरुणांवर उपचार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – अमेरिकेतील न्यू मेक्सिको राज्यातील एका न्यायालयाने इन्स्टाग्राम आणि फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटावर ९४२ दशलक्ष डॉलर्स (अंदाजे ९०३० कोटी रुपये) चा दंड ठोठावला. या प्लॅटफॉर्ममुळे तरुणांच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचली, असे न्यायालयाने म्हटले आहे. या दंडापैकी ४२० दशलक्ष डॉलर्स तरुणांच्या उपचारांवर खर्च केले जातील. उर्वरित रक्कम पुढील पाच वर्षांत जनजागृती, प्रतिबंध आणि तपासणी सेवांवर खर्च केली जाईल. या खटल्याची कार्यवाही दोन टप्प्यांत झाली पहिल्या टप्प्यात, न्यायालयाने मेटावर ३७५ दशलक्ष डॉलर्सचा दिवाणी दंड ठोठावला. कंपनीला प्लॅटफॉर्मवरील बाल लैंगिक शोषणाबद्दल माहिती असूनही ती माहिती लपवून ठेवली, असे न्यायालयाने म्हटले आहे. दुसऱ्या टप्प्यात, न्यायालयाने मेटावर ५६७ दशलक्ष डॉलर्सचा दंड ठोठावला, ज्यामुळे कंपनीवर ठोठावलेला एकूण दंड ९४२ दशलक्ष डॉलर्स झाला. खटल्यादरम्यान, अभियोक्त्यांनी न्यायाधीशांना मेटासाठी मूलभूत बदल अनिवार्य करण्याची विनंती केली. या बदलांचा उद्देश व्यसन लावणाऱ्या वैशिष्ट्यांवर निर्बंध घालून, वय पडताळणी प्रक्रिया सुधारून, आणि गोपनीयता सेटिंग्ज अधिक कडक करून व डीफॉल्ट गोपनीयता सेटिंग्जवर देखरेख ठेवून बाल लैंगिक शोषण रोखणे हा होता. न्यू मेक्सिकोच्या ॲटर्नी जनरलने खटला दाखल केला हा खटला न्यू मेक्सिकोचे ॲटर्नी जनरल राऊल टॉरेस यांनी दाखल केला होता. आरोप असा होता की मेटाचे इन्स्टाग्राम आणि फेसबुक प्लॅटफॉर्म मुलांसाठी असुरक्षित होते आणि कंपनीने जाणीवपूर्वक या धोक्यांकडे दुर्लक्ष केले.

# तब्बल ५१ बालकांसोबत नको ते कृत्य, २२ वर्षीय तरुणाला बेड्या, ४ वर्षांपासून सुरू होता धक्कादायक प्रकार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नंदुरबार** – शहरातून लैंगिक शोषणाचे एक गंभीर प्रकरण समोर आले आहे. नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत तसेच लैंगिक अत्याचारासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायसिंगपुरा येथील २२ वर्षीय चेतन प्रकाश कोळी याला या प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणावर अल्पवयीन बालकांसह काही तरुणांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात तब्बल ५१ अल्पवयीन पीडित असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

पासून प्रकार सुरू असल्याचा आरोप या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीत संबंधित प्रकार २०२२ पासून सुरू असल्याचा उल्लेख आहे. ६ ऑगस्ट २०२६ पर्यंत हे प्रकार सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलांना आणि काही तरुणांना अश्लील व्हिडीओ तसेच छायाचित्रांच्या आधारे धमकावून त्यांचे शोषण केल्याचा आरोप संबंधित तरुणावर करण्यात आला आहे. या प्रकरणातील पीडितांची संख्या मोठी असल्याने पोलिसांकडून संपूर्ण घटनाक्रमाची सखोल चौकशी केली जात आहे.

आरोपीने पीडितांना नेमक्या कोणत्या प्रकारे धमकावले, त्यांच्याकडून कोणत्या स्वरूपाचे शोषण करण्यात आले आणि या प्रकारात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

तक्रारदार पुढे न आल्याने पोलिस कर्मचाऱ्याने दिली फिर्याद या प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. पीडितांकडून किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून तक्रार दाखल करण्यासाठी कोणीही पुढे येत नसल्याने एका पोलीस कर्मचाऱ्याने स्वतः फिर्यादी होत गुन्हा दाखल केला. पीडितांना धमकावले जात असल्याने ते तक्रार करण्यासाठी पुढे येत नसल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. त्यामुळे पोलिसांनी स्वतःहून पुढाकार घेत या प्रकरणाची कायदेशीर प्रक्रिया सुरू केली.

**जाहीर नोटीस**

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६३/२०२६** **ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) फिरोजा बी शेख जमील, वय अं.७० वर्ष, धंदा-घरकाम
२) मोहम्मद फारुख शेख जमील, वय अं.४२ वर्ष, धंदा-मजुरी
३) मोहम्मद सईद शेख जमील, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी
४) आरेफा शेख अब्दुल कदीर शेख, वय अं.४३ वर्ष,धंदा-घरकाम
५) नाजिया परवीन मोहम्मद जावेद, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम
६)नाजीस्ता परविन मोहम्मद जहीर, वय अं.३३ वर्ष, धंदा-घरकाम
७) आलिया अंजुम मोहम्मद जाहिद, वय अं.३९ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत शेख जमील शेख करीमुल्ला, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

**जाहीर नोटीस**

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६२/२०२६** **ने.ता.०९/०९/२०२६**

**अर्जदार :-**

ज्योती मुकुंदराव पोटदुखे
वय अं.६४ वर्ष, धंदा-शेती
रा.नागपूर महाल, माऊली आपार्टमेंट
ता.जि.नागपूर ४००३२

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत प्रभाकर लक्ष्मणराव आंडे व नलीनी प्रभाकर आंडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉल २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०५/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# 'कोणी विद्यार्थ्यांच्या जीवनाचा खेळ केला, तर..'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - 'जंतरमंतरवर जे आंदोलन झालं, त्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांचा राजीनामा नैतिक जबाबदारी म्हणून दिलेला आहे.

ज्यांचं आंदोलन होतं, ते आपापल्या कामात व्यस्त झाले आहेत. जंतरमंतरवर आंदोलन सुरु असताना त्यांच्यामागून राजकारण केलं गेलं. त्यांचं आंदोलन संपलं आहे. पण ह्यांचं आंदोलन संपत नाहीय. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागितला तो दिला. मोदींनीही कठोर पावले उचलली. कायद्यात बदल केला. जे कोणी विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळतील किंवा परीक्षा पेपर लीक करण्याचं पाप करतील, तर त्यांना दहा वर्षांची शिक्षा, दहा कोटी रुपये दंड, फास्ट ट्रॅकवर प्रकरण चालवणे,अशा सर्व गोष्टी केल्या जाणार आहेत.

यासाठी तज्ज्ञ लोकांचा टास्क फोर्सही नेमला आहे, असं मोठं विधान राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केलं.

# दक्षिण मुंबईत घुमला आदिवासी संस्कृतीचा नाद

## उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते 'वनरंग २०२६' चे उद्घाटन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - महाराष्ट्राच्या आर्थिक राजधानीतील नरिमन पॉइंट येथील प्रतिष्ठित वाय.बी.चव्हाण सेंटरमध्ये तीन दिवसीय राज्यस्तरीय सांस्कृतिक व पारंपरिक उत्सव 'वनरंग २०२६'चा अत्यंत भव्य आणि उत्साही वातावरणात शुभारंभ झाला.

या भव्य उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्यास राज्याचे अन्न व औषध प्रशासन व विशेष साहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

दुर्गम जंगले, डोंगरदऱ्या आणि ग्रामीण भागांत जपलेली कला, हस्तकला आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरा देशातील सर्वात महागड्या व प्राइम लोकेशनवर थेट पोहोचवणारा हा सोहळा ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान मुंबईकरांसाठी आयोजित करण्यात आला आहे.

मध्यस्थांपासून मुक्ती आणि थेट आर्थिक लाभावर भर भिल्ल, कोकणा, ठाकर आणि गोंड या जमातींची समृद्ध जीवनशैली आणि कला या महोत्सवाच्या केंद्रस्थानी आहे. या आयोजनाच्या माध्यमातून आदिवासी कारागीर, वैद्य, महिला बचत गट आणि शेतकऱ्यांना कोणत्याही मध्यस्थशिवाय थेट ग्राहकांशी जोडण्याची संधी मिळाली आहे.

हस्तकला, पारंपरिक वारली व गोंड चित्रकारी, सेंद्रिय शेती उत्पादने आणि नैसर्गिक औषधी वनस्पतींच्या विक्रीचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ थेट कारागिरांच्या बँक खात्यात पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे आदिवासी कुटुंबांना शास्वातिक रोजगार आणि आर्थिक बळ मिळणार आहे.

## हवाई दलाचा तोतया जवान अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - पुण्यातील लोहगाव परिसरात भारतीय हवाई दलाचा जवान असल्याचे भासवून वावरणाऱ्या एका तोतया व्यक्तीला लोहगाव पोलिसांनी सतर्कतेने कारवाई करत अटक केली आहे. शुभम विलास अंबुरे (२६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी शुभम अंबुरे याच्याकडून हवाई दलाचे बनावट ओळखपत्र आणि लष्करी गणवेश जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी लोहगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय हवाई दलात कार्यरत असलेले जवान ब्रिजेशकुमार मिश्रा (४८) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे.

# अपवादात्मक परिस्थितीत ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता येते

## मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ राज्य सरकारचा मोठा युक्तिवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मुंबई** - सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय जातींमधील उपवर्गीकरण व आरक्षणाला मान्यता दिली आहे. याच न्यायानुसार मराठा समाजालाही मागास म्हणून स्वतंत्र आरक्षण दिले जाऊ शकते, अशी भक्कम भूमिका शुक्रवारी राज्य सरकारच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात मांडण्यात आली.

मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये देण्यात आलेल्या १० टक्के स्वतंत्र आरक्षणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात दाखल सर्व याचिकांवर सध्या प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरू आहे.

**१९५६ ते २०१८ दरम्यान मराठा समाजाचा अभ्यासच झाला नाही**

सुनावणीदरम्यान राज्य सरकारने उच्च न्यायालयात अत्यंत महत्त्वाचा दावा केला. निवृत्त न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाच्या आधी मराठा समाज मागास आहे की पुढारलेला, याचा कोणीही सखोल अभ्यास केला नव्हता. १९५६ पासून ते २०१८ पर्यंतच्या एकाही मागासवर्ग आयोगाने यावर संशोधन केले नाही. गायकवाड आयोगाने पहिल्यांदाच दोन प्रमुख मुद्यांच्या आधारे समाजाचे व्यापक सर्वेक्षण केले आणि समाजाला मागास म्हणून वर्गीकृत करत आरक्षणाची शिफारस केली होती.

**सुनील शुक्रे आयोगाने त्रुटी दूर केल्या**

जरी सर्वोच्च न्यायालयाने गायकवाड आयोगाच्या पद्धतीतील काही तांत्रिक त्रुटींमुळे पूर्वीचे आरक्षण रद्द केले असले, तरी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील नव्या मागासवर्ग आयोगाने त्या सर्व त्रुटी पूर्णपणे दूर केल्या आहेत.

त्याचदृष्टीने तपशीलवार आणि तुलनात्मक सर्वेक्षण करून मराठा समाज सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे सिद्ध केले व स्वतंत्र आरक्षणाची शिफारस केली, असे सरकारतर्फे स्पष्ट करण्यात आले.

## विरोधक 'हे' ठरवू शकत नाहीत

# अमित शहांविरुद्धच्या विरोधकांच्या आक्षेपांना किरेन रिजिजूंचे उत्तर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** - राजधानीत आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलीस कारवाईवर गृहमंत्री अमित शहा यांनीच लोकसभेत उत्तर द्यावे, या काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या मागणीवर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शुक्रवारी जोरदार प्रत्युत्तर दिले. सभागृहात कोणत्या मंत्र्याने यावे आणि कोणी उत्तर द्यावे, हे विरोधक ठरवू शकत नाहीत, असा स्पष्ट टोला रिजिजू यांनी लोकसभेत लगावला.

विरोधकांच्या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज पुन्हा विस्कळीत झाले. या दरम्यान रिजिजू म्हणाले, गृहमंत्री अमित शहा दररोज संसदेत येतात आणि उशिरापर्यंत उपस्थित राहतात. शहा असे नेतृत्व आहेत, ज्यांच्या नावानेच दहशतवादी आणि जहाल विचारसरणीच्या घटकांच्या अंगावर काटा येतो. विरोधी सदस्यांना इशारा देत ते म्हणाले, जेव्हा लोकसभेत या विषयावर चर्चा सुरू होईल आणि अमित शहा उत्तर देतील, तेव्हा ते ऐकणे विरोधकांना पचणार नाही. संसदेच्या आवारात रिजिजू म्हणाले, सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार कोणत्या मंत्र्याने कोणत्या चर्चेला उत्तर द्यायचे, हे सरकार आणि सभापती ठरवतात. शहा सकाळी आल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत संसदेतच असतात, त्यामुळे विरोधकांनी या विषयावर 'नाटक' करू नये.

गेल्या काही दिवसांपासून लोकसभेतील कामकाज विरोधकांकडून रोखून धरले जात आहे. २० जुलै रोजी संसदेवर धडक देणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या बळाच्या वापराबाबत शहा यांनी सभागृहात उत्तर द्यावे, अशी ठाम मागणी विरोधकांनी लावून धरली आहे.

दरम्यान, एमएसएमई विधेयक मंजूर

शुक्रवारी झालेल्या गदारोळातही शून्यप्रहरादरम्यान अवघ्या १६ मिनिटांत 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (सुधारणा) विधेयक, २०२६' न चर्चा करता मंजूर करण्यात आले.



